# मंत्रिमंडळ निर्णय

**दिनांक १७ जुलै, २०२५**
**(बैठक क्र. २९)**
**(अधिवेशन कालावधी)**

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | राज्यातील खाजगी विनाअनुदानित, अंशत: अनुदानित शाळा - तुकड्या व त्यांच्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे टप्पा अनुदान मंजूर. | **शालेय शिक्षण व क्रीडा** |
| २ | नाथपंथीय समाजासाठी स्थापन महामंडळाचे नाव आता "श्री शिव गोरक्षनाथ नाथपंथी समाज आर्थिक विकास महामंडळ". | **इतर मागास बहुजन कल्याण** |
| ३ | मॅग्नेट २.० प्रकल्प राबविणार, प्राथमिक अहवाल केंद्रास सादर करण्यास मान्यता. | **सहकार, पणन व वस्त्रोद्योग** |
| ४ | बेस्ट उपक्रमाच्या आधुनिकीकरण व प्रणाली क्षमता वाढीकरिता ३ हजार ३४६ कोटी २९ लाख रुपयांच्या सुधारित प्रकल्पास मान्यता. | **ऊर्जा** |
| ५ | सोलापूर जिल्ह्यातील अरण येथील श्री क्षेत्र संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी मंदिर, तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास मान्यता. | **ग्राम विकास** |

**<u>शालेय शिक्षण व क्रीडा विभाग</u>**

## राज्यातील खाजगी विनाअनुदानित, अंशत: अनुदानित शाळा - तुकड्या व त्यांच्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे टप्पा अनुदान मंजूर

राज्यातील खासगी विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळा व तुकड्या व त्यावरील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना टप्पा अनुदान मंजूर करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

सध्या २० टक्के टप्पा अनुदान घेत असलेल्या शासनमान्य खाजगी अंशत: अनुदानित शाळांना २० टक्के अनुदानाचा वाढीव टप्पा निधीसह मंजूर करण्यात आला आहे. यात निकषांची पूर्तता केलेल्या एकूण २ हजार ७९ शाळा, ४ हजार १८३ वर्ग/तुकड्या/अति. शाखा व त्यावरील एकूण १५ हजार ८५९ शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना २० टक्के अनुदानाचा पुढील टप्पा देण्यात येणार आहे. यासाठी वार्षिक ३०४ कोटी रुपयांच्या आवर्ती खर्चास मान्यता देण्यात आली.

अनुदानाच्या ४० टक्के टप्प्यावर वेतन अनुदान घेणाऱ्या १ हजार ८७१ शाळा, २ हजार ५६१ वर्ग-तुकड्या, अति.शाखा व त्यावरील एकूण १३ हजार ९५९ शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना २० टक्के अनुदानाचा पुढील टप्पा देण्यात येणार आहे. त्यासाठी वार्षिक सुमारे २७६ कोटी ५२ लाख रुपयांच्या आवर्ती खर्चास मान्यता देण्यात आली.

अनुदानाच्या ६० टक्के टप्प्यावर वेतन अनुदान घेणाऱ्या १ हजार ८९४ शाळा, २ हजार १९२ वर्ग/तुकड्या/अति.शाखा व त्यावरील एकूण १९ हजार ७४४ शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना २० टक्के अनुदानाचा पुढील टप्पा देण्यात येणार आहे. यासाठी वार्षिक ३४१ कोटी ५८ लाख रुपयांच्या आवर्ती खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच ११ नोव्हेंबर २०२२ नंतरच्या अनुदानासाठी पात्र ठरलेल्या तथापि, शासनस्तरावर अघोषित असलेल्या २३१ प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, ६९५ वर्ग, तुकड्या-अतिरिक्त शाखांवरील एकूण २ हजार ७१४ शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना २० टक्के अनुदान मंजूर करण्यात आले. तसेच, त्याकरिताच्या वार्षिक ४८ कोटी ३२ लाख रुपयांच्या आवर्ती खर्चास मान्यता देण्यात आली.

*****

<u>**इतर मागास बहुजन कल्याण विभाग**</u>

## नाथपंथीय समाजासाठी स्थापन महामंडळाचे नाव आता "श्री शिव गोरक्षनाथ नाथपंथी समाज आर्थिक विकास महामंडळ"

नाथपंथीय समाजासाठी स्थापन करण्यात आलेल्या "परमपूज्य गंगानाथ महाराज आर्थिक विकास महामंडळ" या उपकंपनीच्या नावामध्ये बदल करुन ते "श्री शिव गोरक्षनाथ नाथपंथी समाज आर्थिक विकास महामंडळ" असे करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ या मुख्य कंपनीअंतर्गत "परमपूज्य गंगानाथ महाराज आर्थिक विकास महामंडळ" ही उपकंपनी स्थापन करण्यात आली आहे. या उपकंपनीच्या नावामध्ये बदल करुन ते "श्री शिव गोरक्षनाथ नाथपंथी समाज आर्थिक विकास महामंडळ" असे करण्यास मान्यता देण्यात आली.

******

<u>इतर मागास बहुजन कल्याण विभाग</u>

## मॅग्नेट २.० प्रकल्प राबविणार, प्राथमिक अहवाल केंद्रास सादर करण्यास मान्यता

आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र अग्रिबिझनेस नेटवर्क-मॅग्नेट या प्रकल्पाचा मॅग्नेट-२.० हा प्रकल्प २०२५-२०३१ या कालावधीत राबविण्यास व या प्रकल्पाचा प्राथमिक प्रकल्प अहवाल केंद्र सरकारच्या वित्त मंत्रालयास सादर करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या मॅग्नेट प्रकल्पाअंतर्गत राज्यात उत्पादित होणाऱ्या केळी, डाळींब, पेरू, सिताफळ, संत्री, मोसंबी, चिकू, स्ट्राबेरी, भेंडी, मिरची, आंबा, काजू, लिंबू, पडवळ आदी प्रमुख फलोत्पादन पिकांची मूल्य साखळी विकसित करण्यात येत आहे. या मूल्य साखळीमध्ये खाजगी गुंतवणूक आकर्षित करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, फळे आणि भाजीपाल्यांचे काढणीपश्चात नुकसान कमी करणे, साठवणूक क्षमता वाढविणे, वितरण क्षमता कार्यक्षम करणे आणि शेतकरी उत्पादन संस्थांचा मूल्य साखळीतील सहभाग वाढविणे हे प्रकल्पाचे मुख्य उद्देश आहेत. या प्रकल्पाची राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये सन २०२० पासून अंमलबजावणी करण्यात येत आहे. या प्रकल्पाचा विस्तारित टप्पा, मॅग्नेट २.० प्रकल्प सन २०२५-२०३१ या कालावधीकरिता राबविण्यास तसेच या प्रकल्पाचा प्राथमिक प्रकल्प अहवालाचा मसुदा आर्थिक व्यवहार विभाग, वित्त मंत्रालय, भारत सरकार यांना सादर करण्यास मंजुरी देण्यात आली.

मॅग्नेट २.० प्रकल्पात सध्याच्या १५ फळपिकांच्या व्यतिरिक्त द्राक्षे, पपई, हळद, अंजीर, शेवगा, टोमॅटो आणि आले या ७ नवीन पिकांचा समावेश करण्यात येणार आहे. राज्यातील कृषि विकास प्रणाली अधिक बळकट करण्यासाठी पायाभूत सुविधा सुधारणा, वित्तीय आणि संस्थात्मक सहाय्याचा विस्तार आणि फलोत्पादन पीक निर्यातीला चालना देण्यावर लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे.

******

<u>ऊर्जा विभाग</u>

**बेस्ट उपक्रमाच्या आधुनिकीकरण व प्रणाली क्षमता वाढीकरिता ३ हजार ३४६ कोटी २९ लाख रुपयांच्या सुधारित प्रकल्पास मान्यता.**

वीज कंपन्यांच्या वितरण प्रणालीमध्ये सुधारणा, वितरण हानी कमी करणे, कंपनी आर्थिकदृष्टया सक्षम व्हावी यासाठी तसेच ग्राहकांना अखंडित आणि किफायतशीर दरात वीज पुरवठा करता येईल यासाठी बेस्ट उपक्रमांतर्गत आधुनिकीकरण व प्रणाली क्षमतावाढ याकरिता ३ हजार ३४६ कोटी २९ लाख रूपयांच्या सुधारित प्रकल्प राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.या प्रकल्पाच्या सुधारित आराखड्यास मान्यता देण्यात आली.

केंद्र सरकारकडून सुधारणा अधिष्ठित आणि निष्पत्ती आधारित (Reform-Based and Results-Linked) सुधारित वितरण क्षेत्र योजना हा कालबध्द कार्यक्रम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत मिटरींग, वितरण व पायाभूत सुविधांची कामे, वितरण प्रणाली बळकटीकरण अशी कामे करण्यात येणार आहेत.

बेस्टने २०३० पर्यंत होणारी ग्राहक संख्येतील वाढ व विद्युत भार वाढ विचारात घेऊन सुधारित प्रकल्प अहवाल तयार केला आहे. या अहवालास वितरण सुधार समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. हा अहवाल केंद्र सरकारच्या संनियंत्रण समितीस सादर करण्यास तसेच त्यासाठीच्या कृती आराखड्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

*****

<u>**ग्राम विकास विभाग**</u>

## सोलापूर जिल्ह्यातील अरण येथील श्री क्षेत्र संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी मंदिर, तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास मान्यता

सोलापूर जिल्हयातील अरण (ता. माढा) येथील श्री क्षेत्र संत शिरोमणी सावता महाराज संजीवन समाधी मंदिराच्या १५० कोटी २३ लाख रुपयांच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

श्री संत शिरोमणी सावता महाराज यांचा जन्म इ.स. १२५० मध्ये झाला. ते संत ज्ञानेश्वर व संत नामदेव यांचे समकालीन होते. ते सोलापूर जिल्हयातील पंढरपूर जवळील अरणभेंडी आजचे अरण गावचे रहिवाशी होते. सावता महाराज निस्सीम विठ्ठभक्त होते. सावता महाराज शेतमळ्यात, फुले, आणि भाज्या पिकवणे यातच देव पाहत असत. यातच त्यांनी विठ्ठलाचे रुप पाहिले, असे सांगितले जाते. ते कधीही आपले गाव आणि शेत सोडून पंढरपूरला गेले नाहीत. या आपल्या भक्ताला भेटायला स्वतः विठ्ठल त्याच्या घरी आले, अशी आख्यायिका आहे. आषाढीला सर्व संताच्या पालख्या पंढरपुरला येतात, पण एकादशीनंतर श्री विठ्ठलाची पालखी संत सावता महाराज यांच्या गावी जाते. अरण येथे सावता महाराज यांची समाधी आहे. या समाधी मंदिरास “अ” वर्ग दर्जा देण्यात आला आहे. या तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी ग्राम विकास विभागांतर्गत तयार करण्यात आलेल्या आराखड्यास मान्यता देण्यात आली. यासाठी भूसंपादनाच्या खर्चासह एकूण १५० कोटी २३ लाख रूपयांची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली.

*****